-श्री-

# खरेदीखत

तारीख   /   /२०२६

तुकडी व पोटतुकडी रत्नागिरी येथील मौजे खेडशी, ग्रामपंचायत खेडशी हदीतील, ता. जि. रत्नागिरी येथील मिळकतीचे-

खरेदीखत रक्कम रु  २०,००,०००/- [ रुपये वीस लाख मात्र ] चे असून शासनाचे नमूद बाजारभवाप्रमाणे मिळकतीची किंमत रक्कम रु. १४,८२,०००/- [ रुपये चौदा लाख ब्याऐंशी हजार  मात्र ] होत असून खरेदीखताचे रकमेवर रुपये ---------- /- चा स्टॅम्प दिलेला आहे.

**१) श्रीमती भारती आनंद कंकणवाडी**

पॅनकार्ड नंबर **HJPPK6919B**

वय ५१ वर्षे, व्यवसाय - ------,

रा. घर नं. ८१२, एकता नगर,

खेडशी नाका, खेडशी, रत्नागिरी,

ता. जि. रत्नागिरी. ४१५६३९ **लिहून घेणार**

**२) श्री. अमित आनंद कंकणवाडी**

पॅनकार्ड नंबर **LWPPK1228Q**

वय २६ वर्षे, व्यवसाय - -------,

रा. दिमू सावंत चाळ, रुम नं. १,

खेडशी नाका, भवानी नगर,

पोमेंडी बुद्रुक, रत्नागिरी,

ता. जि. रत्नागिरी. ४१५६३९ **लिहून घेणार**

- **यांसी या लेखाने -**

**१) श्रीमती कस्तुरी बाळासाहेब अकिवाटे**

पॅनकार्ड नंबर **DDFPA5778E**

वय ५७ वर्षे, व्यवसाय - ------,

रा. महालक्ष्मी नगर, खेडशी,

रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी.

४१५६१२ **लिहून देणार**

Scanned with OKEN Scanner

२) **श्री. अक्षय बाळासाहेब अकिवाटे**

पॅनकार्ड नंबर **BIIPA3657A**

वय ३० वर्षे, व्यवसाय - -------,

रा. एकता नगर, रत्नागिरी,

ता. जि. रत्नागिरी. ४१५६१२ **लिहून देणार**

लिहून घेणार यांसी लिहून देणार मजकूर असे खरेदीखत लिहून देतात की,

यापुढे परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत म्हणजेच मूळ मिळकत गट नंबर १२५ हि मिळकत श्री. तानाजी गुंडेराव नारगुडे यांच्या मालकी वहिवाटीची मिळकत होती. सदरची मिळकत ही रेखांकन केलेली असून त्याचा स. न.१२५, हि. नं. १ ब असा आहे व त्यामध्ये मा. तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, रत्नागिरी यांचेकडील मो.र.नं.४९२ ने मोजणी झालेली असून त्यांस मा. नगर रचनाकार, रत्नागिरी यांचेकडील जा. क्र. रेखांकन/स. नं. १२५/१ब/नरर/खेडशी/रत्ना./२१५०दिनांक- २२/१०/९७ ने परवानगी घेतलेली आहे. तसेच मा. तहसिलदार, तसेच मा. नगर रचनाकार यांचेकडील आवश्यक त्या परवानग्या घेऊन सदर मिळकतीत रेखांकन करुन एकूण ४३ निवासी भूखंडाचे रेखांकनास मा. जिल्हाधिकारी साहेब, रत्नागिरी यांचे कार्यासन पत्र क्र. महसुल/कार्यासन/३-४/जमीन[२]/एलएनए/एसआर/४४८ जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी दि. ६/३/९८ अन्वये परवानगी घेतलेली आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी साहेब, रत्नागिरी यांचे कार्यालयीन आदेश नं.क्र.म.शा.का.३-४/एलएनए/एसआर/४४८ जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी दि. ६/३/१९९८ अन्वये सदरची मिळकत ही बिनशेती म्हणून घोषित करणेत आलेली आहे.

सदर भुखंडा पैकी भुखंड क्रामांक १५ म्हणजेच क्षेत्र ०-०३-०० हे.आर. हा भुखंड श्री. बाळासाहेब सत्याप्पा अकिवाटे यांनी श्री. तानाजी गुंडेराव नारगुडे यांचेकडून दिनांक ०९/०९/१९९८ रोजीच्या रजि. खरेदीखताने विकत घेतला. सदरचे खरेदीखत हे मे. दुय्यम निबंधक रत्नागिरी यांचे कार्यालयात दिनांक २५/०१/१९९९ रोजी १ नंबरी बुकाचे १३६ नंबरी नोंदलेले आहे. अशा प्रकारे श्री. बाळासाहेब सत्याप्पा अकिवाटे सदर भुखंडाचे मालक बनले.

त्यानंतर सदर मिळकतीचे दिनांक २५/०१/१९९९ रोजी झालेल्या खरेदीखता संदर्भात श्री. बाळासाहेब सत्याप्पा अकिवाटे व श्री. तानाजी गुंडेराव नारगुडे यांचेमध्ये दिनांक २९/०४/१९९९ रोजी रजि. चुकदुरुस्त लेख करण्यात आला आहे. सदरचा चुकदुरुस्त लेख हा मे. दुय्यम निबंधक रत्नागिरी यांचे कार्यालयात दिनांक ०३/०५/१९९९ रोजी १ नंबरी बुकाचे ८५६ नंबरी नोंदलेले आहे.

त्यानंतर पुढे श्री. बाळासाहेब सत्याप्पा अकिवाटे यांनी सदर जमिन मिळकतीवर घर बांधले व सदर घराला ग्रामपंचायत इमला क्र.८१२ देण्यात आला.

Scanned with OKEN Scanner

पुढे श्री. बाळासाहेब सत्याप्पा अकिवाटे यांचे दिनांक २७/०८/२०१५ रोजी निधन झाले. त्यांचे मृत्यु पश्चात त्यांचे वारस १) श्रीमती कस्तुरी बाळासाहेब अकिवाटे (पत्नी), व २) श्री. अक्षय बाळासाहेब अकिवाटे (मुलगा) हे वारस आहेत. त्याप्रमाणे सदर जमिन मिळकतीच्या ७/१२ सदरी त्यांचे वारसाच्या नावांची नोंद फेरफार नं.७९९४ दि.१४/१०/२०२० ने नोंदवण्यात आली. अशा प्रकारे १) श्रीमती कस्तुरी बाळासाहेब अकिवाटे, व २) श्री. अक्षय बाळासाहेब अकिवाटे हे सदर परिशिष्टात वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे मालक बनले.

सदरची जमिन मिळकत व त्यामधील इमला मिळकत लिहून देणार यांनी निवासी उपयोगाकरीता म्हणून घेतली होती परंतू लिहून देणार यांनी निवासी सोय अन्यत्र केलेने व त्यांचे कौटुबिक अडचणीमूळे रक्कमेची आवश्यकता असलेने लिहून देणार यांनी सदर मिळकत कायमपणे विकण्याचे ठरविले. लिहून घेणार यांना निवासासाठी घर इमलयाची आवश्यकता असलयाने लिहून घेणार यांनी लिहून देणार याचेशी संपर्क साधून लिहून देणार यांची जमिन मिळकत व त्यामधील ग्रामपंचायत इमला विकत घेण्याचे ठरविले. त्यानुसार लिहून देणार व लिहून घेणार यांचेत चर्चा होऊन सदर मिळकतीची मोबदल्याची रक्कम रु. २०,००,०००/- [ रुपये वीस लाख मात्र ] ठरली.

मोबदल्याची रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालील प्रमाणे अदा केलेली आहे :-

१) रक्कम रू २०,००,०००/- [ रुपये वीस लाख मात्र ] दि.--/--/---- रोजीच्या ---- ------- या बँकेच्या चेक नं.------ या चेक व्दारे अदा केलेले आहेत.

अशाप्रकारे मोबदल्याची रक्कम रु. २०,००,०००/- [ रुपये वीस लाख मात्र ] लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना अदा केली आहे. आता सदर खरेदीखतापोटी लिहून घेणार यांचेकडून लिहून देणार यांस कोणतीही रक्कम येणे बाकी नाही.

या खरेदीखताने लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना मौजे खेडशी, ग्रामपंचायत खेडशी हददीतील, ता. जि. रत्नागिरी येथील यापुढे परीशिष्टात नमुद केलेली जमीन मिळकत व त्यामधील ग्रामपंचायत घर त्यामधील तण, काष्ठ, पाषाण, निधिनिपेक्ष,वगैरे दरोबस्त सर्व अंगभूत वस्तू वगैरे सर्व हक्कसंबंधांसह कायमपणे खरेदी देऊन तूमचे प्रत्यक्ष कब्जात दिली आहे. सदर मिळकतीचे लिहून देणार यांनी त्यांचेसाठी मागे कोणताही हक्क राखून न ठेवता सदर मिळकत लिहून घेणार यांस विकत दिली आहे. सदर मिळकतीचे लिहून घेणार हे पूर्ण मालक झाले असून आता त्यावर लिहून देणार व त्यांचे वारस, नातेवाईक, भाऊबंद तसेच इतर कोणीही यांचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध राहीलेला नाही. सदर मिळकत लिहून देणार यांनी यापूर्वी कोणासही विल्हा केलेली नाही अगर तशा प्रकारचा कोणताही करार वगैरे केलेला नाही. सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारे बोजा नाही. असा काही प्रकार असल्याचे आढळून आल्यास व त्यायोगे लिहून घेणार यांचे नुकसान झाल्यास ते लिहून देणार हे भरुन देतील. तसेच लिहून घेणार यांचे निवैध मालकी वहिवाटीस लिहून देणार यांचे वारस, वहिवाटदार,नातेवाईक,भाऊबंद किंवा अन्य कोणी हरकत करतील तर त्याचे निवारण लिहून देणार हे त्यांचे खर्चाने करुन देतील. आता यापुढील सदर मिळकतीचा सरकार दास्त,वगैरे सर्व

Scanned with OKEN Scanner

कर लिहून घेणार यांनी परभारे सांभाळून त्याचा उपभोग पुत्रपौत्रादी वंशपरंपराने घ्यावयाचा आहे.

लिहून घेणार यांस कायम खरेदी दिलेली मिळकत ही लिहून देणार यांनी कोणासही गहाण,तारण,खरेदी,दान,बक्षीस अगर कराराने दिलेली नाही अगर तसा कोणाशीही लेखी अगर तोंडी करार केलेला नाही. लिहून घेणार यांचे उपभोग्यास कोणी हरकत अगर अडथळा केलेस, त्याचे निवारण लिहून देणार हे स्वखर्चाने करुन देतील. सदर मिळकत शासनाचे कोणत्याही योजनेदेखील संपादित करण्यात आलेली नाही, अगर होणार आहे, म्हणून लिहून देणार यांस शासनाकडून कोणतीही नोटीस आलेली नाही. तसेच सदर मिळकतीत कोणाचीही कूळ म्हणून हक्कसंबंध नाही, अगर कोणी कूळ म्हणून दाखल होणेसाठी अर्जही दाखल केलेला नाही. असा काही प्रकार मागाहून आढळून आलेस त्याचे निवारण लिहून देणार हे लिहून घेणार यांस स्वखर्चाने करुन देतील.

आता लिहून घेणार यांनी परिशिष्टामध्ये नमूद कायम खरेदी दिलेल्या मिळकतीस गावकागदी ७/१२ सदरी वगैरे सरकार कागदी कब्जेदार सदरी मालक म्हणून आपले नावं लावून घ्यावे. त्यास हे खरेदीखत ही लिहून देणार यांची अंतिम कबूली आहे. परंतू अन्य सहीसंमती लागल्यास ती लिहून देणार हे लिहून घेणार यांस विनातक्रार, विनामोबदला त्वरीत देतील. सदर दस्तात काही चूक अगर त्रुटी आढळून आलेस ती लिहून घेणार यांनी सांगताच लिहून देणार हे याच मोबदल्यात विनातक्रार रजिस्टर चुकदुरुस्तलेखाने दुरुस्त करुन देतील.

येणेप्रमाणे परिशिष्टात नमूद मिळकतीचे लिहून घेणार हे पूर्ण मालक झाले असून त्याचा उपभोग लिहून घेणार यांनी पूर्ण मालकीने, पुत्रपौत्रादी,वंशपरंपरेने आपले मर्जीनुरुप घ्यावा व मिळकतीचा सरकारदस्त परस्पर मालकीने भरावा. त्याकडे आता लिहून देणार त्यांचे वालीवारसदार, भाऊबंद यांचा कोणताही हक्कसंबंध राहिलेला नाही.

## **परिशिष्ट**

तुकडी रत्नागिरी, पोटतुकडी तालुका रत्नागिरी, सब-रजिस्ट्रार रत्नागिरी, गांव मौजे खेडशी, ग्रामपंचायत खेडशी हददीतील, ता.जि. रत्नागिरी येथील,

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र [आर. चौ. मी.] | आकार [ रु.पै ] |
|---|---|---|
| १२५/४२ | ०-०२-३२<br>०-००-६८<br>०-०३-०० | ०.०१ |

यांसी भुखंड क्रमांक - १५

हि जमिन मिळकत व त्यामध्ये बांधण्यात आलेला ग्रामपंचायत इमला क्र. ८१२ ज्याचे एकूण क्षेत्र ९२.८४ चौ. मी. हि मिळकत.

Scanned with OKEN Scanner

**सदर मिळकतीच्या चतु:सिमा -**

पुर्वेस - स.नं.१२३ ची जमीनजागा.
पश्चिमेस - अंतर्गत रस्ता ९ मीटर.
उत्तरेस - अंतर्गत रस्ता ६ मीटर.
दक्षिणेस - प्लॉट नं.१४.

सदर मिळकत त्यामधील तण,काष्ठ,पाषाण वगैरे अंगभूत गोष्टींसह या खरेदीखताने लिहून घेणार यांस विकत देण्यात येत आहे.

सदर खरेदीखत लिहून देणार यांनी त्यांचे राजीखुषीने व पूर्ण समजुतीने लिहून घेणार यांस करुन दिले.

तारीख- / /२०२६

**साक्षीदार** **सही**

**१) श्रीमती भारती आनंद कंकणवाडी**

लिहुन घेणार

**२) श्री. अमित आनंद कंकणवाडी**

लिहुन घेणार

Scanned with OKEN Scanner

**१) श्रीमती कस्तुरी बाळासाहेब अकिवाटे**

लिहुन देणार

**२) श्री. अक्षय बाळासाहेब अकिवाटे**

लिहुन देणार

Scanned with OKEN Scanner